PUNE METRO

## पुणे महापालिकेकडून महामेट्रोला मेट्रो स्थानकांकरता जमीन उपलब्धतेसाठी मान्यता

पुणे मेट्रोचे वनाज ते रामवाडी व पीसीएमसी ते स्वारगेट या मार्गिकांवर काम प्रगती पथावर चालू आहे . या दोन्ही मार्गिकेमध्ये ठिकठिकाणी मोठ्या प्रमाणावर मेट्रो खांब व दोन खांबांना जोडणाऱ्या स्पॅनची उभारणी दिवसरात्र चालू आहे . या दोन्ही मार्गिकेतील काही किमीचा टप्पा मेट्रो येत्या काही महिन्यात पूर्ण करणार असून त्यासाठी लागणाऱ्या सर्व गोष्टींचे नियोजन करण्यात आले आहे. त्या नियोजनाचा एक भाग म्हणून पुणे मेट्रोने महापालिकेकडून मेट्रो स्थानकां जवळ एस्केलेटर , लिफ्ट , जिने , (एन्ट्री - एक्झिट ) उभारण्यासाठी जागेची मागणी केली होती .



महामेट्रोला पुणे महानगर पालिकेकडून अत्यंत चांगले सहकार्य मिळत असून नुकतेच महापालिकेने संभाजी उद्यान , बालगंधर्व , पुणे मनपा भवन , बंड गार्डन स्थानक , रुबी हॉल स्थानक ,आनंदनगर स्थानक , डेक्कन जिमखाना स्थानक इथे विविध जागा उपलब्ध करून दिल्या आहेत . या जागांमुळे त्या ठिकाणी मेट्रो

स्थानकांच्या कामाला वेग आला आहे. पुणे मेट्रोचे सर्वच स्थानके हे जागतिक दर्जाची गुणवत्ता पूर्वक असून त्यामध्ये प्रत्येक स्टेशन मध्ये लेव्हल वन ला तिकिटिंग आणि इतर प्रवासी सुविधा असतील व लेव्हल दोनला मेट्रो फलाट असेल. मेट्रो फलाटावर जाण्यासाठी प्रत्येक स्टेशनच्या फलाटाच्या दोन्ही बाजूंना जिना/ एस्केलेटर /लिफ्ट ही सुविधा देण्यात येणार आहे. आणि हे असे एन्ट्री / एक्झिट रस्त्याच्या दोन्ही कडेला असेल त्यामुळे मेट्रो फलाटावर जाण्यासाठी प्रवाशांना रस्ता ओलांडण्याची गरज पडणार नाही.



मेट्रो स्टेशनच्या लेव्हल वनला, (कॉनकोस) जाण्यासाठी रस्त्याच्या दोन्ही बाजुंनी एन्ट्री एक्झिटची सुविधा देण्यात येणार आहे . त्यामुळे पादचाऱ्यांना रस्ता ओलांडण्यासाठी पण त्याचा पादचारी पूल म्हणून वापरता येईल. लेव्हल वन हा भाग तिकिटिंग फ्री असल्यामुळे रस्ता ओलांडणाऱ्या पादचाऱ्यांना तिकिट घेण्याची गरज भासणार नाही.